दि. 08/08/2026

**प्रेसनोट**

## नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसाय निर्मूलन मोहिम -2

### पहिल्या आठवडयात (361) गुन्हे दाखल, 4 कोटींचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक 01 ते 31 ऑगस्ट, 2026 दरम्यान, पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांचे मार्गदर्शनाखाली नांदेड परिक्षेत्रात गुटखा, मटका - जुगार, अवैध दारु विक्री, शस्त्र अधिनियम व इतर कलमांन्वये अवैध व्यवसाय निर्मूलन मोहिम -2 राबविण्यात येत आहे.

सदर मोहिमे अंतर्गत, दिनांक 01 ते 07 ऑगस्ट, 2026 दरम्यान संपलेल्या पहिल्या आठवड्यात, नांदेड परिक्षेत्रात, गुटखा व्यावसायिकांविरुद्ध कलम 123 भारतीय न्याय संहिते अंतर्गत (9), महाराष्ट्र जुगार कायद्याअंतर्गत (76), महाराष्ट्र दारुबंदी कायदयान्वये (212), शस्त्र अधिनियमान्वये (14), तर इतर अधिनियमांखाली (50), अशा एकूण (361) कारवाया करुन (512) इसमांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून 4,03,71,916/-  रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**परिक्षेत्रातील विविध घटकांनी या संदर्भात केलेली कारवाई पुढील प्रमाणे :**

| जिल्हा | गुटखा | | | मटका/जुगार | | | दारु | | | शस्त्र अधिनियम | | | इतर केसेस | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | गुन्हे | मुद्देमाल किंमत | आरोपी संख्या | गुन्हे | मुद्देमाल किंमत | आरोपी संख्या | गुन्हे | मुद्देमाल किंमत | आरोपी संख्या | गुन्हे | मुद्देमाल किंमत | आरोपी संख्या | गुन्हे | मुद्देमाल किंमत | आरोपी संख्या |
| नांदेड | 6 | 1,52.688 | 9 | 23 | 11,92,940 | 94 | 59 | 2,49,060 | 62 | 5 | 10,01,000 | 11 | 22 | 2,73,37,955 | 40 |
| परभणी | 0 | 0 | 0 | 17 | 3,53,350 | 30 | 48 | 58,920 | 48 | 2 | 10,31,500 | 3 | 7 | 42,58,675 | 10 |
| हिंगोली | 1 | 87,200 | 1 | 9 | 46,390 | 15 | 57 | 69,490 | 57 | 4 | 22,200 | 4 | 11 | 12,17,760 | 11 |
| लातूर | 2 | 1,28,218 | 2 | 27 | 6,10,910 | 47 | 48 | 53,930 | 48 | 3 | 2,01,500 | 5 | 10 | 22,98,230 | 15 |
| **एकुण** | 9 | 3,68,106 | 12 | 76 | 22,03,590 | 186 | 212 | 4,31,400 | 215 | 14 | 22,56,200 | 23 | 50 | 3,51,12,620 | 76 |

**' खबर ' हेल्पलाइन वरुन माहिती द्या :** अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलीसांना पोहोचविता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने 91 50 100 100 हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, सदर हेल्पलाइन वरून नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयापर्यंत पोहचवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड